Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

ISSUE No- (CCCIII)303

**July -2021**

## Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society



**Prof. Virag S. Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Dr Nitin A. Mathankar**
Executive-Editor
Principal,
Late Vasantrao Kolhatkar
Arts College, Rohana

**Dr. Deoman S. Umbarkar**
Editor
Organizing Secretary
,Department of Sociology
Late Vasantrao Kolhatkar
Arts College, Rohana

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar Publication**

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## July -2021

**ISSUE No- 303 (CCCIII)**

# Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr Nitin A. Mathankar**
**Executive-Editor**
**Principal,**
**Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana**

**Dr. Deoman S. Umbarkar**
**Editor**
**Organizing Secretary ,Department of Sociology**
**Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana**

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 303 CCCIII)
ISSN : 2278-9308
July, 2021

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande,** Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hrushikesh Dalai** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responicible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**
**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication** ,Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile : 9595560278 /**

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 303 CCCIII)
ISSN : 2278-9308
July, 2021

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | भारतीय समाजातील सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप — डॉ.विनोदकुमार धोंडीराम कुंभार | 1 |
| 2 | जाती, वर्गाचा व धर्माचा गरीब लोकांवर होणारा परिणाम — प्रा. एस. के. इंगळे | 4 |
| 3 | भारतीय समाजावर जातीचा परिणाम — डॉ. हनुमंत हि. मिसाळ | 8 |
| 4 | अनुसूचित जाति की बालिकाओं पर शिक्षा के निजीकरण का प्रभाव — डॉ. भारती सागर | 15 |
| 5 | डॉ. आंबेडकरांचे जाती उच्छेदा विषयक विचार — प्रा. बाळकृष्ण कारू रामटेके | 20 |
| 6 | आदिवासी महिलांच्या दर्जावर आदिवासी जाती—जमातींचा होणारा परिणाम : एक अध्ययन — प्रा.डॉ.योगेश प्रल्हाद महाजन | 22 |
| 7 | भारतीय उद्योग व कामगार — डॉ.विनोदकुमार सुकराम चोपकर | 26 |
| 8 | आदिवासीं समोरील आव्हाने व सामाजिक विकास :एक अध्ययन — डॉ.विजया निळकंठ कन्नाके | 30 |
| 9 | दलित आत्मकथनांची वाटचाल — प्रा.डॉ.सुरेश व्यंकटराव कदम | 36 |
| 10 | प्रोफेसर रमणलाल मेहता द्वारा आगरा घराने की संकलित एवं स्वरांकित राग केदार की बंदिश का सांगितिक समिक्षण — Santosh Kisanrao Khandare | 38 |
| 11 | आधुनिक काळात निर्माण झालेल्या वृध्दांच्या समस्या एक अभ्यास — सहा.प्रा संदिप आर. उप्पोड | 43 |
| 12 | महात्मा ज्योतिबा फुले— महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक — **Mr.Rajesh Sharadrao Chavhan** | 47 |
| 13 | भारतातील बांलकाची परिस्थिती — सहा.प्रा राहुल आर. लव्हाळे | 50 |
| 14 | सावित्रीबाई फुले आणि स्त्री शिक्षण — प्रा.राहुल जोंधळे | 53 |
| 15 | जाती, वर्ण आणी वर्ग (एस,एस टी, ओबीसी) व्यवस्थेतील गोंधळ! — डॉ. पुरोषत्तम गुणवंतराव पखाले | 57 |
| 16 | वेदों की द्रष्ट्रा ऋषिकाएँ — प्रा.डॉ.प्रिती मंगेश कुलकर्णी | 60 |
| 17 | १९०९ च्या मोर्ले — मिंटो कायद्याचे परीक्षण — प्रा.डॉ.प्रमिला डी. भोयर | 67 |
| 18 | महिला सक्षमीकरण आणि पंचायत राज — परमानंद उके | 71 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 CCCIII)
ISSN : 2278-9308
July, 2021


| | | |
|---|---|---|
| 58 | महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या घनतेचे भौगोलिक विश्लेषण<br>डॉ. जयदीप रामकृष्ण सोळुंके | 232 |
| 59 | डॉ. भा.ज. कविमंडन यांची सौंदर्यशास्त्रीय भूमिका<br>प्रा. जगजीवन विश्वनाथ कोटांगले | 236 |
| 60 | शहरीकरणाचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम विशेष संदर्भ – मेळघाट, महाराष्ट्र<br>प्रा. डॉ. एच.यु.पेटकर | 239 |
| 61 | संत तुकारामाच्या मनातील अंतर्बाहय संघर्ष प्रा.डॉ.गणेश भि. मोहोड | 244 |
| 62 | भगवानदास मोरवाल के उपन्यासोंमें धार्मिक प्रभाव<br>डॉ. डिंपल सुरेश पाटिल | 250 |
| 63 | गोंड आदिवासी जमातीच्या शैक्षणिक समस्याचे अध्ययन.<br>प्रा.चित्रा दिगंबर साळुंखे | 253 |
| 64 | जात, वर्ग, धर्म ह्यांचा समतावादी तत्त्वावर आधारित पडलेला प्रभाव व परिणाम<br>प्रा. चंद्रशेखर सुधाकर देवघरे | 258 |
| 65 | साहित्यरत्न अण्णाभाऊसाठे : मार्क्सवादी विश्लेषण<br>डॉ. चंद्रकांत धनाजी कांबळे | 260 |
| 66 | भारतीय वर्ण,जातीव्यवस्था आणि आर्थिक परिस्थिती<br>प्रा.डॉ.भगवान सांगळे | 266 |
| 67 | भारतीय वर्ग, वंश आणिजातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधी डॉ. जी. एस. घुर्ये यांचे विचार<br>डॉ. भगवान सुरेश मनाळ | 270 |
| 68 | भारतातील वर्ण ,जातीव्यवस्था आणि धर्मनिरपेक्षता डॉ. अशोक डोळस | 274 |
| 69 | लोकसाहित्य और गढ़वाली लोकगाथाएं प्रा. अनिता शर्मा | 279 |
| 70 | जाती, वर्ण आणि धर्माचा भारतीय व्यक्तींच्या मानसिकतेवर झालेला परिणाम<br>प्रा.अजय व्ही.निंबाळकर | 280 |
| 71 | जाती वर्गाचा आणि धर्माचा राजकारणावर होणार परिणाम<br>डॉ. अजय पी.बोरकर | 284 |
| 72 | बौध्द धर्माचा समाज जीवनावर पडलेला प्रभाव<br>प्रा.डॉ.विद्या श्रीकृष्ण भारंबे | 290 |
| 73 | जेरेमी बेंथॅमची सुखवादी संकल्पना प्रा.डॉ. सुनिलदत्त सोपान गवरे | 294 |
| 74 | भारतीय समाजातजात, वर्ग आणि धर्म यांचा प्रभाव प्रा.डॉ.संतोष मेंढेकर | 302 |
| 75 | स्त्री भ्रूण हत्या – कारणे व उपाय : एक अभ्यास<br>प्रा.डॉ.रोहिणी दि. मेश्राम | 308 |
| 76 | पोवारी साहित्याचे व्यासंगी–डॉ.ज्ञानेश्वर टेंभरे: व्यक्ती व वाङ्मयय<br>प्रा.डॉ. रामलाल चौधरी | 313 |
| 77 | सामाजिक न्याय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉ. राजेश जा. काळे | 319 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 303 (CCCIII) | July 2021

# शहरीकरणाचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम
## विशेष संदर्भ — मेळघाट, महाराष्ट्र

प्रा. डॉ. एच.यु.पेटकर
समाजशास्त्र विभाग प्रमुख कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा.
जि. अमरावती.
मो. न. ९४०३६१८३७५,Email – harishpetkar2012@gmail.com

मानवी समाजाची प्रामुख्याने तीन भागात विभागणी केली जाते. ते म्हणजे आदिवासी समुदाय, ग्रामिण समुदाय व नागरी समुदाय. प्रत्येक समुदायामध्ये सातत्याने परिवर्तन होतांना दिसत आहे. परिवर्तन हा सृष्टिचा नियम आहे तसेच तो आज प्रत्येक समाजाचा/ समुदायाचा देखील नियम बनलेला दिसून येतो. परिवर्तन होत असतांना प्रत्येक समुदायामध्ये परिवर्तनाची गती ही समान नसते. शहरी समुदायापेक्षा ग्रामिण समुदायामध्ये परिवर्तनाची गती ही संथ असते तर आदिवासी समुदायमध्ये परिवर्तनाची गती ही ग्रामिण समुदायापेक्षाही संथ स्वरूपाची असते. प्राचिन काळापासून आदिवासी समूदायने आपली परंपरागत मुल्य, प्रथा, परंपरा व विश्वासांना कमी अधिक प्रमाणात टिकवून ठेवलेले आपणास दिसून येते. परंतू आवश्यक ते बदल आज आदिवासी समूदाय स्विकारत असलेला दिसून येतो. आज दळणवळणाच्या साधणांमुळे व रस्त्यांच्या जाळयामुळे गाव, आदिवासी पाडे, वस्त्यांचे शहरामध्ये मोठया प्रमाणात येणे जाणे वाढले आहे. शहरीकरणाचा झगमगाट पाहून त्यांनाही त्यांच्या जीवनामध्ये परीवर्तन करावेसे वाटने एक स्वाभावीक गोष्ट वाटली. शहरातील जीवनमान आदिवासी समूदायाला आकर्षीत करू लागले त्यामुळे आदिवासींच्या विविध घटकांवर शहरी समुदायाचा प्रभाव दिसू लागला.

औद्योगीकरण, यांत्रीकिकरण आणि विज्ञानाचा विकास व प्रगतीमुळे नगरांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संरचनेला बदलुन टाकले आहे. नागरी व्यक्तींची संपुर्ण जीवनपध्दती ही आधुनिक स्वरूपाची आहे. शहराचा विकास आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संरचनेला बदलून टाकले आहे. नागरी व्यक्तिची संपूर्ण जीवनपध्दती ही आधुनिक स्वरूपाची आहे. शहराचा विकास आर्थिकतेबरोबरच अन्य कारणांनी झाला औद्योगीकरण, यांत्रिकीकरण हे यामागील प्रमुख कारण आहेत. जगामध्ये सर्वत्र मोठमोठी शहरे व त्यांचे आकारमान दिवसेंदिवस वाढत आहे. भारत देखिल त्याला अपवाद नाही. शहराची संख्या आणि विस्तार वाढल्याने देशात शहरी समाजाची विशेषत: भौतीकवादी व्यक्तीवादी जीवनाची तिव्र गती, सामाजिक संबंध, सामाजिक गतिशीलतेमध्ये वृध्दी झालेली आहे.

कोणत्याही देशातिल, राज्यातील अथवा जिल्हयातीलशहरीकरणाचे प्रमाण जसे वाढत जातं तसे काही नविन प्रश्न, समस्याही जन्म घेतात. या समस्यांचा दुष्परीमणाम समाजावर होत असला तरी शहरातिल लोकांना ग्रामिण व आदिवासी समूदायातील लोकांपेक्षा अधिक चांगले जीवन जगण्याची संधी प्राप्त होते त्यामुळे जगातील प्रत्येक देशात, राज्यात अथवा जिल्हयात शहरीकरणाची पातळी सतत वाढत असल्याचे दिसून येते. कारण ग्रामिण व आदिवासी समुदायापेक्षा शहरी समुदायामध्ये आर्थिक विकासाच्या सोयी जास्त उपलब्ध असतात किंवा नवनविन तंत्रज्ञानाचा शोध घेउन त्या निर्माण केल्या जातात.

नागरीकरणाच्या प्रक्रियेतून समाजाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होते. बाजारपेठांची मोठया प्रमाणात वाढ होते. तांत्रिक बदल विसरून येतात त्याचा कृषी क्षेत्रावार परिणाम होतो त्यामुळे कृषी क्षेत्राची गती वाढते व आदिवासी तसेच ग्रामिण जीवनमान उंचावण्यास एकप्रकारची मदतच होते.

### शहरीकरणाचा अर्थ:

भारतात जनगणणेनुसार शहरी क्षेत्राचे पुढील निष्कर्ष ठरविण्यात आले आहेत.

अ)ज्या वस्तींमध्ये महानगरपालीका, नगरपालीका, कॅटानमेंट्स बोर्ड स्थापन झाले आहेत अशा वस्ती की ज्या शासनाने नगर म्हणून मान्य केल्या.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

ब) पाच हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या दर चौ. कि. मी. ला ४०० पेक्षा अधिक लोकसंख्येचे घनत्व आणि बिगर कृषी व्यवसायात ७५ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या कार्यरत असलेल्या वस्त्या म्हणजे शहरी क्षेत्र होय.

क) गावामध्ये बँक, पोष्ट ऑफिस, दवाखाना, दळणवळणाची साधने यासारख्या शहरी वैशिष्टयांचे अस्तित्व असावे.

१. नेल्सन अंडरसन यांच्या मते, "ज्या ठिकाणी उद्योगशिलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपूर्ण जीवनपध्दती नविन तयार होते त्यास शहरीकरण असे म्हणतात."

२. डॉ. मज्जादी हुसैन यांच्या मते,"शहरीकरण म्हणजे नगर आणि शहरामध्ये लोकसंख्येचे विकेंद्रिकरण घडून येणे होय."

३. डॉ. हॅरीस व एल एडवर्ड यांच्या मते, "मानवाची पृथ्वीवरिल उद्योगाची व उपयुक्ततेची केंद्रे म्हणजे शहरे होय."

४. रॉबर्ट बी.मिचेल यांच्या मते,"शहर म्हणजे प्रचंड संख्येतील लोक, विविध धार्मियांची प्रार्थना स्थळे, बँका, इमारती, वाहतूक व सांडपाणी इत्यादींची व्यवस्था होय. या व्यवस्थेद्वारे आपण घडविले गेले असतो.मानवी अनुभुतीच्या दृष्टिने नविन अस्तित्वात आलेली शहरे ही जूनी असतात तर अगदी जुण्या शहराचे नित्य नुतनिकरण होत असते"

वरील सर्व व्याख्यांचा विचार केल्यानंतर आपल्या असे निदर्शनास येते की, शहरामध्ये विविध सोयी सुविधा उपलब्ध असतात त्या सोबतच ग्रामिण व आदिवासी लोकांच्या आकर्षनाचे ते एक विवीधतेने नटलेले गाव असते. मानवाच्या विविध गरजांच्या पुर्तीकरण्याचे ते एक केंद्र असते.

आदिवासी जमातीचा अर्थ :

भारतीय राज्यघटनेमध्ये आणि भारतातील शासन व्यवहारात जमाती या शब्दाचा वापर आदिवासींना संबोधण्याकरीता करण्यात येतो. भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार भारताचे राष्ट्रपती घटनेच्या ३४२ (१) कलमान्वये परिपत्रक काढून एखादया आदिम जमातीतिल अनुसूचित जमात (Sheduled Tribe) म्हणून घटनेच्या पाचव्या अनुसूचिमध्ये टाकू शकतात. त्यामुळे जमातिला अनुसूचित जमाती असा दर्जा प्राप्त होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीतील १९३५ च्या भारत शासन कायदयापासून 'अनुसूचित जमाती' ही घटनाात्मक संकल्पना भारतीय शासन व्यवहरात रूढझालेली आहे. भारतीय राज्यघनेच्या पाचव्या अनुसूचीत जमाती म्हणून राज्यघटनेत जमात (Tribe) हा शब्द वापरला असला तरी ही जमात वा जमाती या संज्ञेची व्याख्या केलेली नाही. एकूण जमात या संज्ञेची सर्व संमत अशी व्याख्या दिसून येत नाही. मात्र जमात या शब्दाच्या वेगवेगळया मानवशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढिलप्रमाणे आहेत.

१. गिलीन आणि गिलीन यांच्या मते, "एका विशिष्ट भुप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतीक जीवन जगणाऱ्या स्थानिक लोकांच्या गटाला आदिवासी समुदाय असे म्हणतात."

२. डॉ. डी. एन. मुजूमदार यांच्या मते,"समान तत्व असणारा, एकाच भुप्रदेशावर वास्तव करणारा, विवाह, व्यवसायासंबंधी समान निषेधनियमांचे पालण करणारा, समान भाषा बोलणारा, परस्पर उत्तरदायीत्व निर्माण करण्याच्या दृष्टिने एक पध्दतशीर व्यवस्था स्विकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंबसमूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समुदाय होय."

३. मानववंशशास्त्राच्या शब्दकोषात ई. बी. टायलर हयांनी केलेली व्याख्या, "एका निश्चीत भुप्रदेशात राहणारा एक बोलीभाषा, सांस्कृतीक एकजीनसीपना आणि एकात्मीक सामाजिक संघटन असलेला सामाजिक गट म्हणजे आदिवासी जमात होय. त्यांचे प्रमाण पुर्वज, समान देवता आणि सामान्यता समान नेतृत्व असते आणि त्यांच्या गटातील सदस्य आर्थिक, सामाजिक,धार्मिक तसेच कौटुंबिक आणि रक्तसंबंधी धाग्यांनी परस्परांशी सलग्न असतात."

वरील व्याख्यांवरून असे दिसून येते की, आदिवासी जमातीची एक बोलीभाषा, एक प्रदेश, समान सांस्कुतीक जीवन, समान देवदेवता व कर्मकांड पुजाअर्चा, अंतर्विवाह समूह असलेला गट आहे.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 303 (CCCIII) | July 2021

संशोधन पध्दती :

संशोधक मागील वीस वर्षापासून कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा येथे प्राध्यापक पदावर कार्यरत आहे. चिखलदरा व धारणी हे मेळघाट क्षेत्रामध्ये येतात. मेळघाटचा परीचय फक्त महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण देशाला आहे. मेळघाट हे आदिवासी क्षेत्र आहे. ७५ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या ही आदिवासी आहे तसेच संशोधक ज्या महाविद्यालयामध्ये शिकवितो त्या महाविद्यालयामध्ये कला शाखेत ८० टक्के विद्यार्थी हे आदिवासी समुदयातील आहे. अनेक शिबीरांच्या माध्यमातून तसेच वेगवेगळया शाळा महाविद्यालयामध्ये दिलेल्या व्याख्यांनांमधून संशोधनकर्त्याचा अनेक गाव, गावकरी, सरपंच, तसेच गावतिल शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत सदस्य, वयोवृध्द व्यक्ती, महाविद्यालयातील तरूण तरूणी यांच्याशी आलेल्या संपर्कातून 'शहरीकरणाचा मेळघाटतील आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम' या विषयाची निवड केली.

संशोधनाची उदिष्टे :

१. आदिवासींच्या आर्थिक जीवनावर झालेला परीणाम जाणून घेणे.
२. शहरीकरणाचा आदिवासींच्या शैक्षणिक जीवनावर झालेला परीणाम अभ्यासने.
३. शहरीकरणाचा आदिवासींच्या वैवाहीक जीवणावर झालेला परीणाम जाणून घेणे.
४. शहरीकरणाचा आदिवासींच्या धार्मिक जीवनावर झालेला परीणाम अभ्यासणे.
५. शहरीकरणामुळे आदिवासींच्या राजकीय जीवनात झालेला बदल अभ्यासणे.
६. शहरीकरणाचा आदिवासींच्या सामाजिक जीवनावर झालेला परीणाम जाणून घेणे.

गृहितकृत्य:

१ शहरीकरणामुळे आदिवासींच्या आर्थिक व शैक्षणीक जीवनावर परिणाम होवून व्यवसाय व शैक्षणिक घटाकंमध्ये बदल झाला.
२ शहरीकरणामुळे आदिवासींच्या विवाह पध्दतीमध्ये बदल झाला.
३ शहरीकरणामुळे आदिवासींच्या धार्मिक जीवनामध्ये बदल झालेला आहे
४ शहरीकरणामुळे आदिवासींच्या सामाजिक व राजकीय जीवनामध्ये बदल झालेला आहे.

संशोधनकर्त्याने मेळघाटमधिल अनेक गावातीलसरपंच,सदस्य, वृध्दमहिला—पुरूष,शाळांमधीलशिक्षक, अंगणवाडी सेवीका, महाविद्यालयातील तरूण, तरूणी,वनविभागातील जेष्ठ कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांच्या घेतलेल्यामुलाखती तसेच विस वर्षापासून संशोधनकर्ता वास्तवास असल्यामुळे त्यांनी केलेलेसुक्ष्म निरीक्षण यामधुन या विषयाची मांडणी केली.

आदिवासींच्या आर्थिक जीवनावर झालेला परीणाम:

शहरीकरणाचा आदिवासींच्या आर्थिक जीवनावर परीणाम झाला. आदिवासींची पारंपारीक असलेली अर्थव्यवस्था उदा. कृषी व शिकार, झाडांची कंद मुळे गोळा करणे, पशूपालन, वेगवेगळी कारागीरी करणे उदा. बांबुपासून टोपल्या बनविने, हस्तकला इत्यांदिमध्ये बदल होवून आज कृषी व्यवस्थेतील पारंपारीकतेमध्ये बबदल घडून आधुनिक शेती अवजारांचा वापर करून शेती करायला लागले, पारंपारीक हस्तकलाचा लोप होवुन आधुनिक साहित्यांच्या वापरांमध्ये मोठया प्रमाणात वाढझाली. शिकार, कंदमुळे गोळा करणे बंद होवून छोटे उदयोग, व्यवसाय, रोड रस्त्यांची काम करून अर्थार्जन करायला सुरूवात झालेली दिसते. वनविभागाच्या कडक नियमांमुळे पशुपालनाचे प्रमाण सुध्दा कमी झाले. एकंदरीत शहरीकरणाचा त्यांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला दिसून येतो.

शैक्षणिक जीवनावर झालेला परिणाम :

साधारणतः तिस चाळीस वर्षापुर्वी आदिवासींमध्ये शिक्षणाचे प्रमाण हे नगण्य होते. आदिवासी जमातीच्या संज्ञेमध्ये त्यांची निरक्षर म्हणून ओळख होती, परंतू दळणवळणाच्या साधनांमुळे त्यांचा शहरीकरणाशी हळूहळू संपर्क वाढत गेला. शहरातील मुले मुली शाळेत जातांना बघुन त्यांनाही आपल्या मुलामुलींना शाळेत पाठविण्याची ओढ निर्माण होत गेली. त्यामुळे गावामध्ये शाळा नसतांना देखील शेजारी गावातील शाळेमध्ये मुलांना शिक्षणाकरीता पाठवू लागले. आज तर प्रत्येक गावामध्ये शाळा आहे त्यामुळे मुलांना शाळेत पाठवितात. इतकेच नाही तर तालुक्याच्या ठिकाणी

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

किंवा जिल्हयाच्या ठिकाणी उच्य शिक्षणाकरीता ते आपल्या मुलांना पाठवू लागले आहेत. शिक्षणामुळे आपल्या पाल्यांमध्ये होणारा बदल लक्षात धेवून इतरांना देखिल ते शिक्षण घेण्याकरीता प्रवृत्त करीत आहे. उच्य शिक्षणाबाबतही काही प्रमाणात त्यांच्यामधे जाणिव निर्माण होत आहे.

**वैवाहिक जीवनावर झालेला परीणाम:**

आदिवासींच्या विवाह पध्दतीवर शहरीकरणाचा फार मोठया प्रमाणावर प्रभाव पडलेला दिसून येतो. आदिवासींची विवाह पध्दती ही फार साधी आणि आगळी वेगळी होती. अनेक वर्षापर्यन्त व आजही मेळघाट मधील काही ठिकाणी वधुमुल्याची प्रथा आहे. अगदी साध्या पध्दतीने विवाह व्हायचे. कोणत्याही प्रकारचा भपकेपणा नसायचा. आपआपल्या ऐपतीप्रमाणे पाहुण्यांना बोलावून साध्यापध्दतीन त्यांचे स्वागत करून आदिवासी विवाह पध्दतीप्रमाणे विवाह पार पाडायचे. आज मात्र हे चित्र धुसर होतांना दिसते आहे. शहरीकरणाचा आदिवासींच्या वैवाहिक जीवनावर प्रभाव पडलेला दिसतो. आज शहरी विवाहपध्दतींचा शिरकाव आदिवासींच्या वैवाहिक जीवनावर प्रभाव पडलेला दिसतो. आज शहरी विवाहपध्दतींचा शिरकाव आदिवासी समुदायामध्ये झालेला दिसून येतो. आदिवासी आपल्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बघुन लग्नामध्ये डीजे, बॅन्डपार्टी बोलवितात. लग्नमंडप, झगमगाट, गालीचे, लग्नविधी यांचा सुध्दा परीणाम आदिवासी कुटुंबव्यवस्थेवर दिसून येतो. विवाहानंतर पुरूषसत्ताक व्यवस्थाच बघायला मिळते पुर्वी पितृसत्ताक व्यवस्था असली तरी स्त्रीयांना कुटुंबव्यवस्थेमध्ये महत्वपुर्ण स्थान असायचे परंतू आज शहरी पुरूषसत्ताक व्यवस्थेचा मोठया प्रमाणात शिरकाव झालेला दिसून येतो.

**धार्मिक जीवनावर झालेला परीणाम:**

आदिवासींच्या धार्मिक जीवनावर मोठया प्रमाणात शहरीकरणाचा प्रभाव पडलेला दिसतो. मेळघाटमधिल आदिवासी समूदाय प्रामुख्याने त्यांच्या पारंपारीक पुजा अर्चा, विधी, कर्मकांड करीत होते. त्यांचे पारंपरीक देव खेडा आणि मुठवा यांचे त्यांच्या धार्मिक जीवनात अनन्यसाधारण महत्व होते. कोणत्याही कार्यप्रसंगी ते खेडा व मुठवा देवाची पुजा अर्चा करायचे परंतू आज मेळघाटमधिल कोरकू समूदाय स्वतःचा धर्म विसरून शहरीकरणामध्ये रूजलेले धर्म उदा. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम यांचे मोठया प्रमाणात अनुकरन करायला लागले. या समुदायातील जी लोक ज्या धर्माच्या संपर्कात आली त्या धर्माचा प्रभाव त्या त्या भागातील लोकांवर पडलेला दिसतो. आज अनेक गावांमध्ये हिंदू धर्माची विविध मंदिरं बघायला मिळतात. तर काही गावांमध्ये चर्च देखिल बघायला मिळते, काही ठिकाणी मुस्लिम धर्माचे अनुकरण करतांना सुध्दा पाहयला मिळते. यावरून आदिवासी समुदाय आपला मुळ धर्म सोडून शहरी संपर्कामुळे इतर धर्मियांचे अनुकरण करीत असतांना आढळतो आहे.

**राजकीय जीवनावर प्रभाव:**

आज आदिवासींच्या राजकीय जीवनावर सुध्दा शहरीकरणाचा मोठया प्रमाणात प्रभाव बघायला मिळतो. पुर्वी त्यांचे राजकीय जीवन हे पंचकमीटीपुरते मर्यादित होते. त्यांना कुठल्याही राजकीय पक्षाची ओळख नव्हती. ते व्यक्तीकडे बघून मतदान करायचे. मतदानाची टक्केवारी सुध्दा कमी असायची परंतू आज शहरी समुदायाच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या राजकीय जीवनात परीवर्तन झाले. आज मेळघाटमधील बहुतांश गावांमध्ये अनेक राजकीय पक्षांचा शिरकाव झालेला आहे. पुर्वी अनेक गावातील ग्रामपंचायत सदस्य अनपोज निवडून यायचे. परंतु आज गावांमध्ये वेगवेगळया राजकीय पक्ष समर्पीत उमेदवार उभे रहायला लागले. अगदी शहरी राजकारणासारखे गावचे राजाकरण सुध्दा तापायला लागले आहे. वेगवेगळया राजकीय पक्षाचे सदस्य गावांमध्ये दिसायला लागले.

**सामाजिक जीवनात परीवर्तन :**

आज मेळघाट मधिल आदिवासी समुदायाच्या जीवममाभात वेगवेगळया पध्दतीने परीवर्तन झालेले पहावयास मिळते. हे परीवर्तन होण्यास शहरांचा फार मोठया प्रमाणात वाटा आहे. एकुणच मेळघाटमधिल आदिवासींचे संपुर्ण सामाजिक जीवनमानात बदल झाला आहे. आज अनेक सण, उत्सव जसे शहरांमध्ये मोठया उत्साहात साजरे केले जातात त्याचप्रमाणे मेळघाटमधिल आदिवासीसमुदायामध्ये देखिल तेवढयाच उत्साहाने साजरे करण्यात येते. उदा. गणेश उत्सव, दुर्गाउत्सव, विविध जयंती या सोबतच आदिवासी समुदायातील तरूण तरूणींचे रहाणीमान उदा.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 303 (CCCIII)
ISSN : 2278-9308
July 2021

केशभुशा, वेशभुशा, घरांची रचना यावर सुध्दा शहरीकरणाचा मोठा परीणाम दिसून येतो. आज आदिवासींची मनोरंजनाची साधनेसुध्दा बदली. त्यांच पारंपारीक नृत्य नावापुरतेच शिल्लक राहीले. सिनेमातील गाण्यांवर आज आदिवासी तरूण तरूणींचे नृत्य सादर होवू लागले. त्यांच्या खानपाणाच्या सवयींमध्ये सुध्दा परीवर्तन झाले. एकुणच शहरीकरणाच्या संपर्कामुळे आदिवासींच्या सामाजिक जीवनात परीवर्तन झालेल दिसुन येते.

निष्कर्श:

संपुर्ण जगामध्ये शहरीकरणामध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. या शहरीकरणाच्या झगमगाट दुनियेने सर्वांचे डोळे दिपवून टाकले आहे. त्याला मेळघाटमधिल आदिवासी कसा अपवाद असेल? आज राजकारणाचा प्रभाव आदिवासींच्या जीवनातील प्रत्येक घटकांवर झालेला दिसून येतो. परंपरागत व्यवस्थेत जगणाऱ्या आदिवासींची कदाचित ही शेवटची पिढी असेल. अनेक आदिवासी तरूण तरूणींना त्यांचे प्रमुख दैवत माहित नाही. पुजा अर्जा कर्मकांड, विधि, माहिती नाही. वेगवेगळया धर्मांचे अनुकरण करावयास लागले आहे. त्यांची सांस्कृतिक साधणे व माध्यमे बदलली आहे. विवाह विधी बदलले, सण उत्सवांमध्ये बदल झाला. भौतिकवादानी आदिवासी जीवनात प्रवेश केलेला दिसून येत आहे. आणि यामध्ये सातत्यांने वाढ होतांना दिसत आहे. एकूणच काही कालावधीत आदिवासी संस्कृतीचा लोप होवून एक नव शहरीकरण संस्कृतीचा उदय होईल असे वाटते.

संदर्भग्रंथ सूची:

१. लोटे रा. ज. (२०१०) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर ४४००३२.
२. कऱ्हाडे बी. एम. ग्रामिण व नागरी समाजशास्त्र पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर ४४००३२.
३. खडसे भा. की. (१९९९) सामाजिक मानवशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, श्री शांता दुर्गा निवास २३, नवी रामदास पेठ नागपूर ४४४००१०
४. N. Jayaplan (2002) "Urban Sociology", Atlantic Publishers and Distributors New Delhi
५. Govt of India "Maharashtra Development" Report 2007
६. UNDP – Human Development Report – 2005
७. मानव संसाधन विकास अहवाल २००५